॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव-४२५ ००१.

परिपत्रक क्र. ७२ /१९९२.

विषय :- प्रथम वर्ष कला वर्गासाठी "मराठी" विषयाचे मूल्यमापन पध्दती व नमूना प्रश्न.

विद्यापीठ अधिकार मंडळाच्या निर्णयानुसार सर्व संबंधितांच्या माहितीसाठी कळविण्यांत येते की, प्रथम वर्ष कला वर्गासाठी १९९२-९३ या शैक्षणिक वर्षापासून सुरु झालेल्या अभ्यासक्रमाच्या संदर्भात मराठी अभ्यास मंडळाने मान्य केलेला मूल्यमापन पध्दतीचा तपशील व नमूना प्रश्न सोबत पाठवित आहोत.

करितां मा.प्राचार्य यांना विनंती की, त्यांनी या परिपत्रकाचा आशय सर्व संबंधित प्राध्यापकांच्या नजरेस आणावा ही विनंती.

जा.क्र. मराठी/अभ्यास/९२/६/२६/६४५२
दिनांक : १०.८.१९९२
जळगांव.

सहा. कुलसचिव.

प्रत माहितीसाठी सादर रवाना :

१] मा. अधिष्ठाता, कला विद्याशाखा
२] सर्व संलग्न कला आणि विज्ञान महाविद्यालयाचे मा. प्राचार्य.
३] मा. सदस्य, मराठी अभ्यास मंडळ, उ.म.वि. जळगांव.
४] मा. कुलसचिव, उ.म.वि. जळगांव.
५] मा. सहा. कुलसचिव, परिक्षा विभाग, उ.म.वि. जळगांव.
६] मा. कक्षाधिकारी, रेकॉर्ड विभाग, उ.म.वि. जळगांव.

डीपी./

॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव-४२५ ००१.

प्रथम वर्ष कला : अभ्यासक्रम

१] काव्यरत्नावली [सत्र १ले]
२] कथाशाला [सत्र २रे]

१] पहिल्या सत्रात "काव्यरत्नावली" या पाठ्यपुस्तकावर ८० गुणांची प्रश्नपत्रिका असेल. वार्षिक गुणदानात सदर सत्रान्त परीक्षेत मिळालेल्या गुणाचे २० पैकी गुणात रूपांतर करून एकंदर मूल्यमापनात या गुणांना स्थान दिले जाईल.

२] वार्षिक परीक्षा ८० गुणांची असेल. पैकी ३० गुणांसाठी पहिल्या सत्रातील "काव्यरत्नावली" या पाठ्यपुस्तकावरील प्रश्न विचारले जातील. राहिलेले ५० गुणांचे प्रश्न कथाशाला" या दुसऱ्या सत्रात शिकविल्या गेलेल्या पाठ्यपुस्तकावर असतील.

३] अभ्यासक्रमांतर्गत पाठ सूक्ष्म अध्ययनासाठी असल्यामुळे संहितानिष्ठ प्रश्न विचारले जातील. आवश्यक तेथे संहिता वा संहितेतील काही अंश उद्धृत करून त्या आधारे प्रश्न विचारले जातील.

४] मूल्यमापन प्रक्रियेतील पुढील घटकांची चाचणी घेता यावी या दृष्टीने प्रश्न विचारण्यात येतील.

१] ज्ञानसंपादन [२] आकलन क्षमता [३] उपयोजन क्षमता
४] विश्लेषण क्षमता [५] संश्लेषण क्षमता [६] मूल्यांकन क्षमता
७] रसास्वाद पातळी [८] भाषिक पारिभाषिक कौशल्याचे उपयोजन.

५] प्रश्नाचे स्वरूप पुढील प्रमाणे राहील-

१] दीर्घोत्तरी [२] लघुत्तरी [३] आस्वादात्मक
४] निश्चित पर्यायी/बहुपर्यायी [५] वस्तुनिष्ठ [६] तुलनात्मक.

६] सादरीकरण कौशल्यांना वाव मिळावा म्हणून रेखाकृती, चित्राकृत, तक्ता, सारणी इ. चा उपयोग करण्याकडे विद्यार्थ्यांचा कल विकसित व्हावा या दृष्टीनेही प्रश्नांची आंतररचना अभिप्रेत आहे.

[क] एका वाक्यात उत्तरे द्या-

१] "आम्ही कोण" या कवितेतील कवी स्वतःला देवाचे लाडके असे का म्हणून घेतात?

२] केशव सुतांची "आम्ही कोण" ही कविता शेक्सपीअरच्या सुनीत आहे की, मिल्टनी सुनीत?

३] "नव्या मनूतील गिरधर पुतळा" असे कोणाला उद्देशून म्हटले आहे?

[ख] पुढील वाक्य कोणाच्या तोंडचे आहे?
त्यातून कोणता भावार्थ व्यक्त होतो?

१] "चार ठिकाणचे उकिरडे उंगायचीं सवयच आहे मेल्याला."

२] " अरे मुर्खा, अशा रस्त्यावर पडलेल्या गोष्टी का आपण उचलायच्या?.... बरं पण असू देत ते बूट आत्ता गाडीतंर परंत त्या गर्दीत सापडशील तू"

[ग] पुढील पद्यपंक्ती काळजीपूर्वक वाचून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे द्या

"आम्हाला वगळा गतप्रभ झणी होतील तारांगणे
आम्हाला वगळा-विकेल कवडी मोलावरी हे जिणे"

१] "तारा" कशाचे प्रतीक आहे?
२] "कवडी" कशाचे प्रतीक आहे?
३] "आम्ही" म्हणजे कोण?

[घ] खालील गोष्टींचे वर्णन कोणत्या "उपमा" देऊन कवीने केले आहे?

कविता : दणकट दंडस्नायू [मर्ढेकर]

| | |
|---|---|
| दणकट दंडस्नायू | ---------- |
| काव्या कभिन्न गांड्या | -------------- |
| फुरफुरणारी भट्टी | -------------- |

[च] लघुत्तरी प्रश्न

१] सर्वसामान्य माणसापेक्षा कवीचे वेगळेपण कशात आहे? [आम्ही कोण?]
२] प्रतिमा आणि प्रतिक यांतील फरक सांगा
३] "गझल" या काव्यप्रकाराची प्रमुख वैशिष्टये.
४] "हायकू" ची वैशिष्टये
५] "रूपक कथा" ची वैशिष्टये सांगा.

[छ] तुलनात्मक प्रश्न [दीर्घोत्तरी]

१] केशवसुत आणि केशवकुमार यांच्या "आम्ही कोण" या कवितांची तुलना करा.
२] पारंपारिक "वही" आणि आधुनिक "वही" यांतील साम्य भेद स्पष्ट करा.
३] कवी ग्रेस यांची "पाऊस" व यशवंत मनोहर यांची "काळ्या पाऊस" ह्या कवितांची तुलना करा.
४] "जगणं-विगणं आणि "चट्टामट्टा" या कवितांतील साम्य-भेद स्पष्ट करा.

[ज] आशयात्मक प्रश्न

१] ज्ञानेश्वरांनी ईश्वराकडे कोणते मागणे मागितले आहे?
२] गाडगीळांनी खुटखुट्यांच्या चाळीचे चित्र कसे रेखाटले आहे?

[झ] रसास्वादात्मक प्रश्न

१] नवकथेची वैशिष्टये सांगून एक नवकथा म्हणून "ऽिडलेली माणसे" ची रसग्रहण करा.
२] कवितेचे रसग्रहण विचारतांना पूर्ण कविता उद्धृत करून खालील मुद्दे दिले जातील त्या आधारे रसग्रहण करावे. अशा प्रश्नाला अंतर्गत पर्याय असणार नाही.

[ट] क्षेत्रीय कार्यासाठी प्रश्न

१] "काचव्या चिमणीची गोष्ट" ह्या कथेतील "काचळी" ही निवेदिका आहे असे गृहीत धरून ही कथा नव्याने लिहून पहा.
२] "अंगणातील पोपट" या कथेचा निवेदक "भाईसाहेब" आहे असे गृहित धरून या कथेचे पुनर्लेखन करा.

[ठ] पुढे काही संस्कृतिविशेष दिले आहेत त्या संदर्भात खुटगुट्यांच्या चाळीचे गाडगीळांनी केलेले वर्णन समोरच्या चौकटीत भरावयाचे आहे. नमुना म्हणून एक/दोन चौकटी भरून दाखविल्या आहेत. उरलेल्या तुम्ही भरावयाच्या आहेत. [येथे नमुना उत्तर म्हणून जागा कोरी सोडलेली नाही.]

| क्रमांक | संस्कृति विशेष | चाळीतील वास्तव |
|---|---|---|
| [१] | संस्कृतीचा सुपीक मळा | खुटगुट्यांची चाळ |
| [२] | प्रतापशाली शिवनेरी | खुटगुट्यांची चाळ |
| [३] | सामाजिक श्रेणी | पन्नास रुपयांपासून दीडशे रुपयांपर्यंत वाढत जाणाऱ्या पगाराच्या श्रेणी |
| [४] | पुरुषाचे जीविताचे केंद्रबिंदू | [१] साहेबांची मर्जी राखणे<br>[२] पगारवाढ |
| [५] | स्त्रियांच्या योग्यतेचे मानदंड | [१] नवऱ्याचा पगार<br>[२] स्वत:चे सौंदर्य |
| [६] | संसार धर्माचे चार आश्रम | [१] नोकरी मिळवणे [२] लग्न करणे<br>[३] मुलांची शिक्षणे करणे<br>[४] पेन्शन घेणे |
| [७] | आवश्यक धर्मकृत्य | दिवसा उत्तरक्रिया. |
| [८] | संस्कृतीचे जटिल प्रश्न | राखर आणि रॉकेल |
| [९] | सामाजिक सोहळे | मेळावे साहित्यिक व गणपती उत्सव |
| [१०] | अद्भुत कथा | प्रीती विवाह |
| [११] | सांस्कृतिक वारसा | दारिद्र्य आणि संकुचितपणा |

[ड] "किडलेली माणसे" या कथेतील पात्रांची नावे पुढील तक्त्यात दिलेली आहेत. त्यांचे वर्णन गाडगीळांनी कसे केले आहे ते ही नमूद केले आहे. त्यातून त्या व्यक्तीचे कोणते स्वभाव विशेष व्यक्त होतात ते लिहा. [नमुना म्हणून एका प्रश्नाचे उत्तर दिले आहे. इतर त्याप्रमाणे लिहा.]

| क्रमांक | पात्र | विशेषण | कृती/लकबी | स्वभाव विशेष |
|---|---|---|---|---|
| १. | मालतीबाई | "नटवा" | जाणवट नवऱ्यावर खेकसणे | [खोटा क्षुद्र अहंकार] |
| २. | बंडोपंत | "तिखे" | आपल्या भरांवर राजकीय मतांनी शेजाऱ्यांना घाबरविणे | [चिरडलेली अधिकार लालसा अन्यत्र भागविणारे दुबळेपण] |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३. | घारुअण्णा | "खिंकाळणारा अड्डा | बट आपले म्हणून दोस्तावर खेकसणे" व दुसऱ्याच क्षणी ते दोघात शेतात का ते पाहणे | [दांभिकपणा] |
| ४. | दामू | ------- | पेंद दाराच्या फटीतून डोकावून पाहणे" | [अकाली विकृत झालेले मन] |
| ५. | लीला | --------- | दुसऱ्या स्त्रीचे अंबाड्याचे टोक सुटले तर तोंडाला हात लावून हसणे शेजारच्या बैलाकडे पाहून हसणे | [आधुनिकतेचे प्रदर्शन] |
| ६. | भैय्या | --------- | मनात आल्या बरोबर चपलांचे जोड काखोटीला मारून नेणे | [निर्लोभ मन] |

येथे कधी "स्वभावविशेषां"च्या जागा भरायला सांगता येतील तर कधी "विशेषणा"ची जागा भरायला लावता येतील/कधी इतर सर्व तपशील देऊन पात्राचे नाव विचारता येईल.

[ढ] योग्य तेथे रिकाम्या जागा भरा. "पाऊस" [ग्रेस] आणि "काळ्या पाऊस" [यशवंत मनोहर] या कवितांची तुलना करा.

| | पाऊस [ग्रेस] | काळ्या पाऊस [यशवंत मनोहर] |
|---|---|---|
| [१] | गयरचना छंदोबद्धता | ------------------- |
| [२] | "पाऊस" ही प्रतिमा | --------------- |
| [३] | --------------- | समाजनिष्ठ अनुभूती |

नमुना उत्तरे [१] मुक्त शैली [२] पाऊस हे प्रतीक
[३] व्यक्तिनिष्ठ अनुभूती

[न] तुकारामाच्या अभंगात लौकिक जीवन आणि संतजीवन यांतील भेद स्पष्ट केला आहे. हा भेद दर्शविणारे नेमके शब्द रिकाम्या जागी भरा.

| क्रमांक | लौकिक जीवन संदर्भ | संत जीवन विशेष |
|---|---|---|
| [१] | घर-दार हेच विश्व | आकाश मंडप पृथ्वी आसन ही विश्व व्यापक वृत्ती. |

| | | |
|---|---|---|
| [२] | सगे सोयरे | [वृक्षवल्ली हेच सोयरे] |
| [३] | धन-संपत्ती बाळगणे | [कथा-कमंडलू हीच संपत्ती] |
| [४] | भोजन | हरिकथा |
| [५] | वाद संवाद | मनाशी संवाद [आपलाची वाद आपणाशी] |
| [६] | गणगोतात रमणे ही सुखकल्पना | एकांत आवडे एकांतात सुख] |

[त] वाङ्मयप्रकारनिष्ठ प्रश्न

[१] कुठल्याही प्रकारची गोष्ट नसतांना "किडलेली माणसे" ही कथा कशी कथा ठरते ते सांगा.

[२] "पोपट" या प्रतिकाचा अर्थपूर्ण उपयोग करून कथाकाराने कथा कशी गुंफली आहे ते स्पष्ट करा.

[३] "अंगणातील पोपट" या कथेच्या आधारे दिवाकर कृष्णांच्या कथेच्या निवेदन शैलीची वैशिष्ट्ये सांगा.

[४] बीज कथेचा रूपकात्मक वापर करतांना गौरी देशपांडे यांनी "कावळ्या-चिमण्याची गोष्ट" या कथेत कोणते नावीन्य आणले आहे?

[थ] टीपा लिहा.

१] केशवसुतांना अभिप्रेत असलेले "कविप्रतिभेचे कार्य"

२] पद्य आणि कविता यांतील साम्य भेद.